नियमीत दिवाणी दावा क्र. ११६/२०१४

निशाणी क्र. ५१

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबाणी,</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

**माझे नावः** प्रभातसिंग सुमन,

**वयः** ५० वर्षे, **व्यवसायः** युनियन बॅक, ब्रॅच— घाटकोपर,

**पत्ताः** ठाणे, जि. ठाणे.

**<u>वादीतर्फे सरतपास वकिल श्री. डी. बी. गडगे यांच्यातर्फे सुरुः</u>**

१. मला न्यायालयाचे साक्षी समन्स मिळाले होते. साक्षी समन्स प्रमाणे मी वादीचा खाते उतारा दाखल केलेला आहे. मी युनियन बँक मध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. वादीचा खाते क्र. ३९८००१०१००३७६८२ असा आहे. ते करंट अकाउंट आहे. त्या खाते उता–यावर माझी सही आहे. दि. २१/११/२०११ रोजी बँक ऑफ इंडीया यांचा वादीने प्रतिवादीस दिलेला धनादेश आहे. तसेच दि. २२/०९/२०११ रोजी वादीने प्रतिवादीस चेक दिलेला आहे. सदरच्या रकमा एकुण रु. १,३६,०००/– आहे. सदर खाते उता–यास **निशाणी ५४** देण्यात येत आहे. मी खाते उता–याच्या पृष्ट्यर्थ ६५–ब चे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे त्यास **निशाणी ५५** व बँकर्स बुक्स ऑफ एव्हीडन्स या अंतर्गत प्रमाणपत्र दिलेले आहे ते बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी ५६** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रस्तुतचा दावा एकतर्फा असल्याने प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश करण्यात आला.</u>**

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.01.07 12:34:09 +0530

**(एस. एस. देशमुख)**

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

स्थळ - खालापुर.
दिनांक - ०६/०१/२०२६